# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि ७५ /2020 दिनांक: १७/ 03 /2020

## आदेश

उघडयावरील मांस विक्रीस प्रतिबंध.

वाचा - १. **सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०**

२. **साथरोग अधिनियम,१८९७**

३. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचे पत्र जा.क्र. अजिप/ साप्रवि/स्था-१/कावि-३५१/२०२०**

**ज्या अर्थी**, शासनाने *करोना* विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागु करण्यात आला असून, दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केली आहे. करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-याचे मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत गर्दी व वर्दळीचे ठिकाणे बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

**ज्या अर्थी**, अकोला जिल्हयातील सर्व शहरी व ग्रामिण भागामध्ये उघडयावर मांस विक्री करण्यात येत असल्याचे तसेच जिवंत/ मृत कोंबडया यांची लोकवस्तीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक जागेवर विल्हेवाट लावण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाबीमुळे साथीचे रोगाचा प्रादुर्भाव वाढून कोरोणा सारख्या विषाणूचा फैलाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**त्या अर्थी**, **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** मधील तरतूदीनुसार तसेच **आपत्ती व्यवस्थापन कायदा - २००५ व दिनांक १४.३.२०२० चे अधिसूचनेच्या** अधिन राहून मला असलेल्या अधिकारानुसार मी, **जितेन्द्र पापळकर, भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी , अकोला** , करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच सदर विषाणूपासून दक्षता व खबरदारी घेण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्यामुळे **अकोला जिल्हयातील शहरे तसेच ग्रामिण भागातील उघडयावरील मांस विक्री करण्यास तसेच जिवंत/ मृत कोंबडया यांची लोकवस्तीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक जागेवर विल्हेवाट लावण्यास या द्वारे प्रतिबंध करीत आहे.**

त्याच प्रमाणे, (1) या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांचीकिंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता, (१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक १७ मार्च २०२०** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

यांना माहिती करिता सादर

४. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
**५. आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला.** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही आपलेस्तरावरुन करावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.
६. **जिल्हा पशु संवर्धन अधिकारी,**अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही आपलेस्तरावरुन करावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.
**७. मुख्याधिकारी, नगर परिषद/ नगर पंचायत ------------------------------ सर्व** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही आपलेस्तरावरुन करावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सादर करावा.
८. उपविभागीय अधिकारी ------------------------------------ सर्व.
९. तहसिलदार-------------------------------------------- सर्व
१०. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
11. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अकोला.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**